ePaper

## कंत्राटी तत्त्वावर शासकीय कर्मचाऱ्यांच्या भरतीच्या निर्णयाला ब्रेक



| वर्ष - 7 । अंक - 86 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत


- भारतीय खेळाडूंचा जलवा!
- कंगना राणौतला कोर्टाचा दणका!
- ज्ञानवापीवर पुन्हा सुनावणी
- टोलमुक्त महाराष्ट्राचं काय झालं?


www .mahaenews.com | ।गुरुवार , दिनांक 27 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# थकबाकीदारांना 'रेडअलर्ट'!

## ›› 'जप्त मालमत्तांची होणार विक्री : मिळकतकर विभागाचा इशारा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गतवर्षी महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने बड्या थकबाकी असलेल्या दोन हजार पेक्षा जास्त मालमत्ता सील केल्या आहेत. या मालमत्ता पैकी एक रूपयांचा देखील कर न भरलेल्या मालमत्तांचा टप्पा-टप्याने लिलाव करण्याचे कामकाज महापालिकेने हाती घेतले आहे.**





पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने गतवर्षी कर वसुलीसाठी विविध उपक्रम, जनजागृती केली. त्यानंतरही कर न भरणाऱ्या नागरिकांच्या दोन हजार मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. या जप्त केलेल्या मालमत्ता धारकांना कर भरण्याचे आवाहन केले. त्यानंतर काही मालमत्ता धारकांनी आपल्या कराचा भरणा केला आहे. मात्र, ज्या मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला नाही, अशा मालमत्ता टप्पा-टप्याने विक्री करण्याचे नाईलाजाने निर्णय महापालिकेने घेतला आहे.

जप्त केलेल्या मालमत्तांची विक्री कशा पद्धतीने करावी, यासाठी महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने आज बुधवारी (दि.26) संत तुकाराम नगर येथील आचार्य अत्रे सभागृहात कर संकलन विभागाचे मंडलाधिकारी, गट लिपिक यांना प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण कर संकलन विभागाचे सल्लागार अनिल लाड यांनी दिले. यावेळी कर संकलन व कर आकारणी विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख, प्रशासन अधिकारी राजाराम सरगर, नाना मोरे, कार्यालय अधीक्षक विरणक यांच्यासह आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जप्त केलेल्या मालमत्तांची अशा पध्दतीने लिलाव करावा, या लिलावाची सविस्तर कार्यपध्दती गतवर्षी स्थायी समितीने ठरवून दिलेली आहे. लिलाव करताना कशा प्रकारच्या अडचणी येतात, जाहिरात करताना मालमत्तांचे मुल्यांकन कसे करावे, 21 दिवसांची जाहिरात कशी द्यावी, मालमत्ता धारकांला बचावाची संधी देणे, त्याचबरोबर नैसर्गिक न्याय तत्त्वाचा वापर करणे, उच्च न्यायालयात, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची माहिती कर्मचाऱ्यांना देण्यात आली.



> कर संकलन विभागाची सक्षमपणे बांधणी करण्याचे नियोजन आखण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून अधिकारी, कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येते. गतवर्षी जप्त केलेल्या मालमत्तांची थकबाकी भरली नाही. अशा मालमत्तांची लिलाव प्रक्रिया प्रथमच राबवली जाणार आहे. त्यामुळे यामध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहू नये, यासाठी कर संकलन विभागाला प्रशिक्षण आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. यामुळे कर वसुली अधिक प्रभावी होईल, असा विश्वास आहे.
>
> – **शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक पिंपरी-चिंचवड महापालिका



> शहरात अनेक आजारी कंपन्या याचबरोबर पिंपरी-चिंचवड शहर औद्योगिक नगरी असल्याने उद्योगांची संख्या जास्त आहे. अनेक आजारी उद्योग हे राष्ट्रीय कंपनी कायदा लवाद (एनसीएलटी) मध्ये जातात. अशा मालमत्तांचा कर वसूल करण्यासाठी वेळीच राष्ट्रीय कंपनी कायदा लवादकडे न गेल्यास कर बुडण्याची शक्यता असते. गत काळामध्ये अशी अनेक प्रकरणे निदर्शनास आल्यामुळे एनसीएलटीच्या तरतुदींचेही सविस्तर प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहे.
>
> – **नीलेश देशमुख,** सहाय्यक आयुक्त, कर संकलन विभाग.

# पुनावळेतील प्रस्तावित कचरा डेपोला विरोध!

## ›› मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची दखल : प्रस्ताव तपासून सादर करण्याची सूचना

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुनावळे येथील प्रस्तावित कचरा डेपो रद्द करा अशी मागणी शिक्षण मंडळाचे माजी सभापती चेतन भुजबळ यांनी केली आहे. चेतन भुजबळ यांनी आज (दि.२६) आमदार अश्विनी जगताप यांच्या समवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे ही मागणी केली आहे. यावर सदर प्रस्ताव तात्काळ तपासून सादर करावा असे आदेश मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी सचिवांना दिले आहेत.**



चेतन भुजबळ यांनी आज विधानभवन, मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार या सर्वांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी जगताप ह्या उपस्थित होत्या. याप्रसंगी पुनावळे येथील प्रस्तावित कचरा डेपो रद्द करण्याबाबत मान्यवरांना निवेदन देण्यात आले. मुख्यमंत्र्यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीमध्ये असलेल्या पुनावळे येथे महाराष्ट्र शासन वनविभागाची २६ हेक्टर जागा आहे.

(पान 5 वर)

# टोलमुक्त महाराष्ट्राचं काय झालं?

## » टोल नाक्याची तोडफोड केल्यानंतर राज ठाकरेनी प्रतिक्रिया दिली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सुपूत्र अमित ठाकरे यांचे वाहन अडवून ठेवल्यामुळे मनसेच्या कार्यकर्त्यांनी समृद्धी महामार्गावरील टोल नाक्यावर रविवारी (२३ जुलै) मध्यरात्री टोलनाक्याची तोडफोड केली होती.**



अमित ठाकरे हे शिर्डीहून मुंबईला येत असताना सिन्नर तालुक्यातील गोंदे टोल नाक्यावर हा प्रकार घडला. या घटनेपासून अमित ठाकरे हे नाव चर्चेत आहे. भाजपाने अमित ठाकरेंवर टीकाही केली होती. आता, त्यावरून राज ठाकरेंनी भाजपालाच प्रतिसवाल केला आहे.

आज त्यांनी पुण्यात माध्यमांशी संवाद साधला. "त्या टोलनाक्यावर अमितची गाडी बराच वेळ उभी होती. त्याच्या कारवर फास्टॅगही होता. तरीदेखील त्याला थांबवून ठेवलं होतं.

तो त्यांना सांगत होता की, मी टोल भरला आहे, तरी त्याला थांबवलं. मग ही फोडाफोडी झाली. त्यावेळी टोल नाक्यावरील कर्मचाऱ्याचा वॉकीटॉकी सुरू होता आणि समोरचा माणूस त्यावरून उद्धटपणे बोलत होता. त्यावर आलेली ही मनसैनिकांची प्रतिक्रिया आहे. अमित महाराष्ट्रभर टोल फोडत सुटलेला नाही. भाजपाने यावर बोलण्यापेक्षा भाजपाने टोलमुक्त महाराष्ट्र करू असं निवडणुकीच्या काळात सांगितलं होतं, त्याचं काय झालं हे भाजापने सांगांव. टोल हे जे म्हैसकर नावाच्या माणसाला मिळतात, तो कोण आहे?", असा सवाल ठाकरेंनी उपस्थित केला.

"समृद्धी महामार्गावर रस्ता बनवताना तिथे फेन्सिंग टाकलेलं नाही.

समृद्ध महामार्ग सुरू झाल्यापासून तिथे अपघातात ४०० लोक गेलेत, याची जबाबदारी भाजपा किंवा सरकार घेणार का? अपघातात माणसं मरतात ही सरकारची जबाबदारी नाही का? लोकांच्या जगण्या-मरण्याची काळजी नाही, पण रस्ता बनवला आहे तर आम्हाला लगेच टोल पाहिजे, लोकं गाड्या चालवतात मरूदेत," अशी टीका राज ठाकरेंनी केली.

### जागा वाटपाचा अधिकार केंद्रीय बोर्डाला

» राज ठाकरे यांनी आज (२६ जुलै) यावर भाष्य केलं आहे. राज ठाकरे सध्या पुणे दौऱ्यावर आहेत. त्यांनी पुण्यात मनसेच्या शाखाध्यक्ष, विभाग अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. आगामी निवडणुकीसाठी राज ठाकरे पक्षबांधणी करण्यात व्यस्त आहेत. त्यासाठी ही बैठक होती. या बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत राज ठाकरे यांनी टोल नाक्याच्या तोडफोडीच्या प्रकरणावर भाष्य केलं.

# गंध दरवळला गीत रामायणाचा संगीत सोहळा उत्साहात

## » श्री. एस. पी. देशमुख शिक्षण संस्थेच्या विद्यानिकेतन, विद्या व्हॅली स्कूलमध्ये कार्यक्रम

। चाकण । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**श्री.एस.पी. देशमुख शिक्षण संस्थेच्या विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल आणि विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूल, चाकणच्या संयुक्त विद्यमाने प्रशालेमध्ये श्री. सुधीर फडके यांच्या जयंतीचे औचित्य साधुन गंध दरवळला/ गीत रामायण या संगीत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मुख्य आकर्षण म्हणजे श्री राम, सीता व लक्ष्मण बनुन आलेले छोटे विद्यार्थी . सर्वजण राम नामाचा जयघोष करत होते.**




सोहळ्याला खरी रंगत आली ती संगीत शिक्षिका नयन बाळसराफ यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या श्रवणीय, सुमधुर आवाजात मृदुंगाच्या तालावर नृत्य सादर करून रामायण सोहळ्यात संपूर्ण पौराणिक कथेची. लहान वर्गातील विद्यार्थ्यांनी पौराणिक वेशभुषा धारन करून सुंदर गीत सादर करून आनंद द्विगुणीत केला. विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री सोमनाथ हत्तुरे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व कार्यक्रमाची माहिती विद्यालयाच्या पर्यवेक्षिका शीतल थोरात यांनी दिली. प्रमुख अतिथींची ओळख व सत्कार समारंभ मोनाली नलावडे यांनी केले त्याचबरोबर नृत्य दिग्दर्शन विद्यालयातील शिक्षिका पुनम दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले सर्व विद्यार्थ्यांनी सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दीच्या कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद घेत अतिशय सुरेख व श्रवणीय सादरीकरण करून उपस्थित त्यांची मला जिंकली विद्यालयातील अतिशय लहान विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सुंदर सादरीकरण करून आपल्या कलेचा आविष्कार दाखविला.

### यांची विशेष उपस्थिती व मार्गदर्शन लाभले

» विद्यानिकेतन स्कूल चे प्राचार्य श्री शिंदे सर यांनी गीत रामायणाचे महत्व विशद केले. या गीत रामायणात संस्थेचे संस्थापक श्री. साहेबराव देशमुख सर, सौ. सुमनताई देशमुख यांचे विशेष उपस्थिती व मार्गदर्शन लाभले. सदर कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व प्रिन्सिपल मा.श्री.दीपक शिंदे सर सहभागी झाले होते.

» अशाप्रकारे अतिशय उत्साही, आनंदी व वातावरणात एक आगळा वेगळा गंध प्रशालेच्या प्रांगणात दरवळला/ गीत रामायण सोहळा पार पडला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. स्वरदा भास्कर व तेजस्विनी या विद्यार्थिनींनी केले तसेच आभार प्रदर्शन भगत मॅडम यांनी सादर केले.

# शहरात इलेक्ट्रिकल व्हेईकलला प्रोत्साहन!

## आयुक्त शेखर सिंह सुतोवाच : मनपा- आरएमआय इंडियाची संयुक्त बैठक

### शहरात 2026 पर्यंत 30 % ईलेक्ट्रीक वाहने वापराचे लक्ष्य निर्धारित



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ईलेक्ट्रीक व्हेईकल सेल आणि आरएमआय (रॉकी माउंटन इन्स्टिट्यूट) च्या सहाय्याने 'पिंपरी चिंचवड सिटी इलेक्ट्रिक व्हेईकल रेडिनेस' आराखडा तयार करण्यात आला आहे. या माध्यमातून शहरात सन २०२६ पर्यंत ३० टक्के ईलेक्ट्रीक वाहनांचा वापर वाढणार असून इलेक्ट्रिक वाहन प्रभावीपणे वापरासाठी पिंपरी चिंचवड शहर सज्ज असल्याची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात मनपा आणि आरएमआय इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ईव्ही वाहनांचा वापर वाढविण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनांबाबत चर्चा करताना ते बोलत होते. यावेळी, पीएमपीएलएम चे व्यवस्थापकीय संचालक सुचेंद्र प्रताप सिंह, आरएमआय इंडियाच्या व्यवस्थापकीय संचालक अक्षिता घाटे, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, बाबासाहेब गलबले, उपायुक्त रविकिरण घोडके,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पुणे मनपा, महावितरण, उपप्रादेशिक परिवहन महामंडळाचे अधिकारी- कर्मचारी आदी उपस्थित होते. ईव्ही सेलने बुधवारी 'पिंपरी चिंचवड सिटी इलेक्ट्रिक व्हेईकल रेडिनेस प्लॅन' चे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

> “२०२६ पर्यंत नवीन वाहन नोंदणीत ३०% EVS योगदान देण्याचे योजनेचे प्रस्तावित लक्ष्य साध्य केल्याने शहराच्या हद्दीत तैनात केलेल्या वाहनांच्या जीवनकाळात कार्बन उत्सर्जन ०.८ दशलक्ष टन कमी करण्याची क्षमता आहे. ईव्हीचा इतक्या वेगाने अवलंब केल्याने, आम्ही शहरी गतिशीलता डिकार्बोनायझेशनच्या प्रक्रियेला गती देऊ शकतो आणि शहर अधिक टिकाऊ बनवू शकतो.
>
> **-शेखर सिंह,**
> आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका

### ईव्ही रेडिनेस प्लॅन हा लक्ष्य

आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, शहरी गतिशीलतेचे परिदृश्यामध्ये बदल, पिंपरी चिंचवडच्या ईव्ही संक्रमणाला आणखी गती देण्यासाठी नऊ कृती करण्यायोग्य उपाय सुचवले आहेत. आरएमआय (रॉकी माउंटन इन्स्टिट्यूट) च्या तांत्रिक सहाय्याने तयार केलेल्या या आराखडयानुसार पिंपरी चिंचवड शहरात २०२६ पर्यंत ३० % ईलेक्ट्रीक वाहने वापराचे लक्ष्य निर्धारित केले आहे. यामध्ये, ईव्ही चार्जिंग आणि बॅटरी स्वॅपिंग पायाभूत सुविधा, शहरातील ईव्ही ऑपरेशन्स, सार्वजनिक वाहतूक विद्युतीकरण आणि ईव्ही घटक उत्पादनाशी संबंधित आहेत. पीसीएमसीने या वर्षाच्या सुरुवातीला फेब्रुवारीमध्ये आयोजित केलेल्या सिटी ईव्ही एक्सीलरेटर कार्यशाळेदरम्यान १०० हून अधिक भागधारकांनी याबाबत सूचीत केले होते. ईव्ही रेडिनेस प्लॅन हा लक्ष्य आणि शहर-स्तरीय उपक्रमांचा एक संच आहे. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्र नजीकच्या काळात ईव्ही निर्माण शहराचे घटक साकार करण्यासाठी हाती घेतील, असे त्यांनी सांगितले.

### बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे

1. पिंपरी चिंचवड शहरात दरवर्षी सुमारे दीड लाख नवीन वाहनांची नोंदणी होते.
2. २०२१ पूर्वी, पिंपरी चिंचवडमधील नवीन वाहन नोंदणीमध्ये ईव्हीचा वाटा १% होता.
3. पीसीएमसीने ईव्ही सेल वेबसाइट विकसित केली.

# ताथवडे-रावेतमधील रस्त्यांचा ‘मेकओव्हर’

## शंकर जगताप यांची मागणी : शेखर सिंह यांचे सकारात्मक आश्वासन



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील समाविष्ट गावे ताथवडे, रावेत आणि पुनावळे परिसरातील रस्त्यांची कामे सुरू आहेत. ऐन पावसाळ्यात या भागातील नागरिक, वाहनचालकांना मनःस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने सुरू असलेली कामे तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केली आहे.**

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची बुधवारी महापालिका भवनात भेट घेतली. यावेळी माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी स्थायी समिती सभापती विलास मडिगेरी, माजी नगरसेवक राजू दुर्गे, उद्योजक नवीन लायगुडे, बाळासाहेब करंजुले उपस्थित होते. शंकर जगताप म्हणाले की, ताथवडे, रावेत, पुनावळे या परिसरामधील रस्त्यांची चालू असलेली कामे तातडीने मार्गी लावावीत. अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. पावसामुळे काही ठिकाणी पाणी साचले आहे. किरकोळ अपघाताच्या घटना घडत आहेत. याबाबत प्रशासनाने गांभीर्याने उपाययोजना करणे अपेक्षीत आहे.

दरम्यान, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी रस्त्यांची सुरू असलेली कामे लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे ताथवडे, पुनावळे आणि रावेतमधील नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

### ढोल-ताशा पथकांना निशुल्क परवागनी

शहरात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ढोल-ताशा पथकांचा सराव सुरू झाले आहेत. ढोल-ताशा पथकांच्या परवानगीसाठी प्रशासनाकडून शुल्क आकारले जात होते. मात्र, शहरातील तरूण-तरुणी या पथकांमध्ये छंद किंवा कला म्हणून सहभागी होतात. ढोल-ताशा हा पारंपरिक वाद्य प्रकार आहे. त्यामुळे अधिकधिकारी पथकांनी गणेश विसर्जन मिरवणूक, आगमन मिरवणूक यामध्ये सहभागी व्हावे. तसेच, सर्वसमान्य- कष्टकरी कुटुंबातील युवकांना यानिमित्ताने रोजगार निर्माण व्हावा, या दृष्टीकोनातून ढोल-ताशा पथकांची परवानगी शुल्क रद्द करावे, अशी मागणी शंकर जगताप यांनी केली. त्यालाही प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, सदर शुल्क रद्द करण्यात आले. त्यामुळे शहरातील ढोल-ताशा पथकांना निशुल्क परवानगी मिळणार आहे.




**गरिबीची व्याख्या निश्चित करता आली, तर ती दूर करण्यासाठी योग्य प्रयत्न करता येतील. पण त्याबाबतीत आपण अजूनही चाचपडतो आहोत. 'आझादी का अमृत महोत्सव' सुरू असलेल्या वर्षीदेखील आपण गरिबी नेमकी कशी शोधायची हे समजून घेण्याचा प्रयत्न करत आहोत. आपलं राज्य हे कल्याणकारी राज्य आहे.**

# गरीब कुठे आहेत?

.आणि आपल्या संविधानातही गरीब, वंचित, दुर्लक्षित यांच्यासाठी विशेष प्रयत्न सरकारने केले पाहिजेत हे स्पष्ट नमूद केलेलं आहे. त्यामुळे गरीब कोण, ते किती गरीब आहेत हे प्रश्न अत्यंत जटिल असले तरी त्याची उत्तरे शोधणे आवश्यक आहे. नीती आयोगा'ने दारिद्र्याच्या विविध प्रमाणांवर आधारित 'मल्टी डायमेन्शनल पॉवर्टी इंडेक्स' काढलेला आहे. आणि तो मागच्याच आठवड्यात विविध माध्यमांतून आपल्यासमोर आला. यासंदर्भात एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की हा अहवाल करोनाआधीच्या आकडेवारीवर आधारित आहे. त्यामुळे करोनामुळे वाढलेल्या गरिबीचा उल्लेख या अहवालात नाही.



१९७१ साली दांडेकर आणि रथ यांनी गरिबी रेषा (पॉवर्टी लाइन) ही संकल्पना पुढे आणली. त्यानंतर सुरेश तेंडुलकर या अर्थतज्ज्ञांनी त्यात काही बदल केले आणि आताची दारिद्र्यरेषेची संकल्पना तयार झाली. या सगळ्यातून आपण सातत्याने शोधत असतो की नेमके गरीब किती आहेत आणि ते नेमके कोण आहेत? हे कळल्याशिवाय आपण कल्याणकारी योजना त्यांच्यापर्यंत कशा पोहोचवणार? यासाठी ते कोण आहेत आणि कुठे आहेत आणि किती आहेत हे समजून घेणे गरजेचे ठरते.

सुरुवातीला आपण फक्त उष्मांक हे परिमाण मानले होते. म्हणजे गरीब कुटुंबाला किंवा व्यक्तीला अन्नधान्य किती लागतं? तेवढंही मिळत नसेल तर ते गरीब आहेत. नंतर आपण असा विचार करायला लागलो की फक्त अन्नधान्य हीच काही जगण्यासाठी आवश्यक गोष्ट नाही. घर, कपडे, अगदी सायकल आहे का अशापासून शिक्षण आणि आरोग्य सेवा अशा जगण्यासाठीच्या इतर वस्तू आणि सेवा यांचासुद्धा समावेश करून आपण गरिबी समजून घेण्याचा प्रयत्न करायला लागलो. आता विविध अंगांनी गरिबी समजून घेण्यासाठी 'निती आयोगा'चा 'मल्टी डायमेन्शनल पॉवर्टी इंडेक्स' आपल्यासमोर आला आहे.

या अहवालातून आपल्याला काही महत्त्वाच्या आणि आवश्यक गोष्टी समजतात. एक म्हणजे यात त्यांनी वापरलेली पद्धत खूप विस्तृतपणे दिलेली आहे आणि त्याला खूप महत्त्वही आहे. 'ऑक्सफर्ड पॉवर्टी अँन्ड ह्यूमन डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह' म्हणजे ओपीएचडीआय आणि यूएनडीपी-युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्रॅम यांनी एकत्रित जगातील सर्व देशांसाठी म्हणून काही परिमाणं निश्चित केलेली आहेत. त्यातून निर्देशांक कसे काढायचे याची एक पद्धतही निश्चित केलेली आहे. यामध्ये शिक्षण, आरोग्य आणि राहणीमान या तीन पैलूंमध्ये गरिबी समजून घेण्याचा प्रयत्न केला जातोय. भारताने हा अहवाल तयार करताना 'नॅशनल फॅमिली हेल्थ सव्र्हे'मधील आकडेवारी घेतलेली आहे. आरोग्य या परिमाणात कुपोषणाची परिस्थिती, बालमृत्यू किंवा तरुण म्हणजे १८ वर्षांच्या आतील मुलामुलींचे मृत्यू, गरोदर मातेच्या किंवा बाळंतिणीच्या मृत्यूचे प्रमाण या गोष्टी येतात. शिक्षणाच्या परिमाणामध्ये घरात एक तरी व्यक्ती किमान सहा वर्ष शाळेत गेलेली आहे का, शिक्षणाचं वय असलेल्या मुलांपैकी किती मुलं-मुली शाळेत जात नाहीत, ही त्या कुटुंबासंदर्भातली माहिती इथे विचारात घेतली जाते. तिसरे परिमाण राहणीमानासंदर्भात आहे. स्वयंपाकासाठी इंधन कोणतं वापरलं जातं? स्वतंत्र शौचालय आहे का? पिण्याचा पाण्याची सोय काय आहे? किती लांबून आणावं लागतं? घरात वीज आहे का? घर बांधकामाचे साहित्य काय आहे? घर किती पक्कं आहे? किती कच्चं आहे? घरात रेडिओ, टेलिफोन, टीव्ही, बैलगाडी, सायकल, दुचाकी वगैरे आहे का हे बघितलं जातं. यातील एकापेक्षा जास्त वस्तू असलेल्या कुटुंबाला वंचित म्हणता येत नाही. घरातल्या एका तरी व्यक्तीचं बँक अकाऊंट आहे की नाही ही माहितीही घेतली जाते. या अहवालातून असं दिसतं की इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र गरिबी कमी करण्याच्या दरात १४ व्या क्रमांकावर येतं. म्हणजे, इतर १३ राज्यांनी या पाच वर्षांत त्यांची गरिबी कमी केलेली आहे. हा अहवाल जिल्ह्यांचीही परिस्थिती सांगतो. त्यात आपल्याला महाराष्ट्रातील विविध जिल्हे आता नेमक्या कोणत्या टप्प्यावर आहेत.

## संपादकीय »

# निद्रानाश टाळण्यासाठी..

***भारतीय राजकारणाच्या गुन्हेगारीकरणासाठी कोणा एका पक्षाला दोषी धरणे हा मध्यमवर्गीय आणि समाजमाध्यमी पलायनवाद झाला. वास्तव 'सर्वपक्षीय' आहे..***

राजकारणाच्या गुन्हेगारीकरणासाठी कोणा एका पक्षाला दोषी धरणे हा मध्यमवर्गीय आणि समाजमाध्यमी पलायनवाद झाला. वास्तव 'सर्वपक्षीय' आहे.. सुमारे ११ वर्षांपूर्वी गाजलेल्या गीतिका शर्मा आत्महत्या प्रकरणातील आरोपी गोपाल कांडा यास न्यायालयाने निर्दोष सोडल्यावर लगेच त्यास मिठीत घेण्यासाठी भाजप भगवे उपरणे घेऊन सरसावला असेल तर त्यात धक्का बसावा असे काही नाही. तेव्हा या कांडास उद्या हरयाणाच्या निवडणुकीत भाजपने उमेदवारी दिल्यास आणि त्यात हे गृहस्थ जिंकल्यास ते भाजप-शासित सरकारात मंत्रीसंत्री झाले तरी आश्चर्य वाटणार नाही. न जाणो नरेंद्र मोदी सरकार त्यास केंद्रातही राष्ट्रउभारणीच्या महान कार्यात समवेत घेईलही. तेव्हा या साऱ्यामुळे धक्का बसण्याचे काहीच कारण नाही.

**'कारगिल विजय दिवस' २६ जुलै रोजी यंदाही साजरा होईल आणि तितका मोठा संघर्ष १९९९ पासून गेल्या २४ वर्षांत झालेला नाही, पण आज काय स्थिती आहे? पाकिस्तानच्या अण्वस्त्र कार्यक्रमाचे एक 'शिल्पकार' जे म्हणत आहेत, त्याला निव्वळ वल्गना म्हणून सोडून द्यायचे की त्याचे गांभीर्य लक्षात घ्यायचे? कारगिल संघर्ष घडण्याच्या सुमारे वर्षभर आधी, पाकिस्तानने अणुचाचणी केली.**

# पाकिस्तानला काबूत ठेवण्यासाठी

ती करण्याचे कारण, भारताने अशीच चाचणी केली असे दिले गेले. मात्र तेव्हापासून जगभर या दोन अण्वस्त्रधारी शेजाऱ्यांबद्दल चिंता व्यक्त होऊ लागली. गेल्या २४ वर्षांत मोठा संघर्ष झाला नाही, हे चांगलेच. परंतु अण्वस्त्रांविषयी पाकिस्तानची मानसिकता काय आहे? पाकिस्तानच्या अणुचाचणीचा वर्धापनदिन त्या देशात 'योम- ए- तकबीर' म्हणून अधिकृतपणे साजरा केला जातो. यंदा त्या चाचणीचे २५ वर्ष, म्हणून जोर जरा अधिकच होता. पाकिस्तानचे निवृत्त लेफ्टनंट जनरल आणि आता त्या देशाच्या 'नॅशनल कमांड ऑथोरिटी'चे सल्लागार असलेल्या खालिद किडवाईंचे प्रमुख भाषण इस्लामाबादच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ स्ट्रॅटेजिक स्टडीज'मधील सोहळ्यात झाले. वास्तविक या संस्थेमधील 'शस्त्र-नियंत्रण आणि निरस्त्रीकरण केंद्र' हे त्यांच्या भाषणाचे प्रमुख आयोजक होते, पण किडवाईंनी पाकिस्तानच्या अण्वस्त्रसज्जतेबद्दल



जी काही विधाने, तीही ज्या पद्धतीने केली, ते व्यूहनीती अभ्यासकांची तसेच कोणाही शांतताप्रेमींची चिंता वाढवणारेच ठरते. हेच किडवाई पाकिस्तानची अण्वस्त्रसज्जता वाढवली जात असताना सेवेत होते. भारताने १९७१ मध्ये पाकिस्तानला धूळ चारली, मग १९७४ मध्ये भारताने अणुचाचणीही केली, म्हणून पाकिस्तानलाही अण्वस्त्र कार्यक्रमाकडे वळावे लागले अशा नेहमीच दिल्या जाणाऱ्या कारणांचा पाढा वाचल्यावर किडवाईंनी पाकिस्तानची लष्करी नीती 'फुल स्पेक्ट्रम डिटरन्स'ची – म्हणजे पर्यायाने, अण्वस्त्रहल्ला होणारच असे गृहीत धरून शस्त्रास्त्रसज्जता ठेवण्याची गरज का आहे, यावरही उपस्थितांना 'मार्गदर्शन' केले. याआधीच्या काळात पाकिस्तानची नीती ही अगदी गरजेपुरती अण्वस्त्रे ठेवण्याची (क्रेडिबल मिनिमम डिटरन्स) होती, ती राखूनच पाकिस्तान 'फुल स्पेक्ट्रम डिटरन्स'कडे वळला आहे, असे ते म्हणाले. भारताची नीती ही अण्वस्त्रे टाळण्यासाठी अन्य प्रकारची सज्जता राखण्याची (कोल्ड स्टार्ट डॉक्ट्रीन) आहे, याचा उल्लेख त्यांनी केला खरा, पण भारताकडून असणाऱ्या संभाव्य धोक्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पाकिस्तानाची नीती योग्यच, अशी भलामणही त्यांनी केली.

पाकिस्तानच्या अण्वस्त्रसज्जतेचे अगदी तपशीलवार वर्णनच या किडवाईंनी जाहीरपणे केले. अण्वस्त्रसज्जतेबद्दलची 'क्षितिजसमांतर आयाम' आणि 'ऊर्ध्वगामी आयाम' वगैरे परिभाषा वापरत ते म्हणाले की, पाकिस्तानचे पायदळ, नौदल आणि हवाईदल या तीन्ही दलांकडून अण्वस्त्रांचा उपयोग होऊ शकतो, इतकी सज्जता आहे.

## ।। अभंगवाणी ।।



दुजा ऐंसा कोण बळी आहे आतां ।
हरि या अनंता पासूनिया ॥१॥

बळियाच्या आम्ही जालों बळिवंता ।
करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कंत्राटी पोलीस भरणार नाहीत!

## » विरोधी आमदारांनी सरकारला फैलावर घेतले

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई पोलीस दलात कंत्राटी पद्धतीने तीन हजार पदे भरण्याच्या सरकारच्या निर्णयाचे विधानपरिषदेत काल (२५ जुलै) पडसाद उमटले. या निर्णयावरून विरोधी आमदारांनी सरकारला फैलावर घेतले होते. कंत्राटी भरतीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती.**

सरकारने यावर निवेदन करण्याचे निर्देश उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले होते. या निर्देशानुसार, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवेदन देऊन ही भरती कंत्राटी पद्धतीने नसून महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातून भरती करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,"महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातून भरण्यात येणाऱ्या या तीन हजार कर्मचाऱ्यांना केवळ सुरक्षाविषयक कामकाज, गार्डविषयक कर्तव्याची कामे देण्यात येणार असून कायदेविषयक अमंलबजावणीचे काम देण्यात येणार नाही."२४ जुलै २०२३ च्या निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातून उपलब्ध करून देण्यात आलेले पोलीस हे नियमित पोलीस शिपाई पदावर कर्तव्यावर उपलब्ध झाल्यानंतर त्यांच्या सेवा संपुष्टात येणार आहेत. (म्हणजेच ११ महिन्यांनी किंवा त्यापेक्षा कमी कालावधीत तात्पुरत्या पोलिसांची सेवा संपुष्टात येईल.) राज्य सरकारच्याच महामंडळातर्फे उपलब्ध करून देण्यात आलेल्या जवानांना शासकीय कार्यालये, व्यावसायिक प्रतिष्ठाने, सार्वजनिक ठिकाणी इत्यादी करता यापूर्वीही सुरक्षा नियमित केली आहेत आणि वापरली जात आहेत. त्यामुळे ही भरती कंत्राटीपद्धतीने घेतली जात नाहीत", यावर फडणवीसांनी जोर दिला. "राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ तयार केलं होतं. या महामंडळातून ज्यांना नियुक्त केलं जातं, त्यांना विमानतळे, इतर आस्थापनांवर गार्डिंगची कर्तव्य दिली जातात. गेली तीन वर्षे पोलीस भरती न झाल्याने मुंबई पोलिसांची मोठी तूट झाली आहे. एकावेळी अनेक भरती करता येत नाही, कारण तेवढी ट्रेनिंग सुविधा नाही. पण १८ हजारांची करतो आहे. भरती पूर्ण झाली असून ते आता ट्रेनिंगला जाणार आहेत. मुंबईसारख्या शहरांत १० हजार पोलिसांची तूट ठेवून शहर सुरक्षित ठेवता येत नाही. त्यामुळे कंत्राटी पद्धतीने नाही तर या महामंडळातून जसे इतर आस्थापनांना पोलीस दिले जातात, तसेच मुंबई पोलिसांना दिले जाणार आहेत. कुठेही यात कंत्राटी पद्धतीचा वापर केला जाणार नाही.



### कायदेविषयक अमंलबजावणी

» महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातून भरण्यात येणाऱ्या या तीन हजार कर्मचाऱ्यांना केवळ सुरक्षाविषयक कामकाज, गार्डविषयक कर्तव्याची कामे देण्यात येणार असून कायदेविषयक अमंलबजावणीचे काम देण्यात येणार नाही. तसेच मुंबई पोलिसांना दिले जाणार आहेत. कुठेही यात कंत्राटी पद्धतीचा वापर केला जाणार नाही. तो करण्याचा विचारही नाही", असं देवेंद्र फडणवीसांनी विधान परिषदेत स्पष्ट केलं.

# मुंबई महानगरात रेड अलर्ट

## » रत्नागिरी, चंद्रपूरातील शाळांना उद्या सुटी

। मुंबई । प्रतिनिधी। महाईन्यूज

**हवामान विभागाने मुंबई महानगराला आज रात्री 8 ते उद्या दुपारपर्यंत अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता, महानगरपालिका आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल यांनी मुंबई शहरातील महानगरपालिकेच्या तसेच सर्व शासकीय आणि खासगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व सर्व महाविद्यालयांना गुरुवारी 27 जुलै रोजी सुट्टी जाहीर केली आहे.**

मुंबईकरांनी रेड अलर्टच्या पार्श्वभूमीवर सतर्क रहावे. गरज असेल तरच घराबाहेर पडावे. तसेच प्रशासनाच्या माध्यमातून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनांचे पालन करावे, असे आवाहनही महापालिकेच्या वतीने करण्यात आले. हवामान विभागाने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार जिल्ह्याला रेड अलर्ट देण्यात आलेला आहे.



### राज्यात पावसाचा जोर वाढला

» राज्यात पावसाचा जोर वाढला आहे आणि पुढील पाच दिवस पावसाची कोसळधार सुरुच राहणार असल्याचं हवामान विभागाने सांगितलं आहे. राज्यात कोकण, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर आणि विदर्भातील विविध जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस कोसळतोय. या तुलनेत मराठवाड्यामध्ये कमी पाऊस पडतो आहे. भारतीय हवामान विभागाच्या पुणे वेधशाळेनं पुढील पाच दिवस राज्यात पावसाचा जोर वाढणार असल्याचा इशारा दिला आहे.

जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होवू नये, यासाठी शाळा, विद्यालयांना गुरूवारी सुट्टी जाहीर करण्यात आली. यासंबधिचे आदेश जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी दिले. चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी उद्या म्हणजे 27 जुलै रोजी शाळा-महाविद्यालयांना सुट्टीचा आदेश जारी केला आहे. चंद्रपूर जिल्ह्याला हवामान खात्याचा रेड अलर्ट जारी झाला आहे. जिल्ह्यातील सर्वच नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. आपत्कालीन परिस्थिती व अनुचित घटना टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार जिल्ह्यात उद्या म्हणजेच गुरुवारी रेड अलर्ट देण्यात आला आहे. जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस सुरु असल्याने तसेच खेड तालुक्यातील 'जगबुडी' नदीने धोका पातळी ओलांडलेली आहे. संगमेश्वर येथील शास्त्री नदी, राजापूर येथील कोदवली नदीने इशारा पातळी ओलांडली आहे.

जिल्ह्यात अनेक भागात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होवू नये यासाठी उद्या 27 जुलै रोजी शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

# पुनावळेतील प्रस्तावित कचरा डेपोला विरोध!

। पिंपरी । प्रतिनिधी। महाईन्यूज

**(पान 1 वरुन)** या जागेवर पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने मागणी केल्यामुळे सदर जागा महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. या जागेवर महापालिकेने २००८ साली कचरा डेपोसाठी आरक्षण टाकले आहे.

### शहराला दुषित पाणीपुरवठा?

२००८ साली पुनावळे येथे नागरीकरण झाले नव्हते. मात्र गेल्या पंधरा वर्षांत या भागात विविध शैक्षणिक संस्था, मोठे गृह प्रकल्प, शेजारी हिंजवडी आयटी पार्क असल्याने पुनावळे येथे देशभरातील अनेक नागरिक येथे नोकरी आणि व्यवसायानिमित्त स्थायिक झाले आहेत. सध्या पुनावळे या उपनगराची लोकसंख्या जवळपास एक लाखाच्या आसपास झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत पुनावळे येथे कचरा डेपो झाल्यास येथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण होईल. तसेच पुनावळे येथील बांधऱ्यामधून संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरास पाणीपुरवठा केला जातो. या कचरा डेपोमुळे शहरातील सर्व नागरिकांना दुषित पाणी पुरवठा होण्याची दाट शक्यता आहे.

### पर्यावरणाची होणार हानी...

»सध्या वनविभागाच्या २६ हेक्टर जागेवरती अनेक प्रकारची दाट वृक्षे आहेत. सदर कचरा डेपो येथे निर्माण केल्यास या जागेवरील संपूर्ण वृक्ष तोड करावी लागेल. त्यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होणार आहे. तरी या सर्व बाबी विचारात घेवून पुनावळे येथे प्रस्तावित असणारा कचरा डेपो रद्द करण्यात यावा अशी ग्रामस्थांच्या वतीने मागणी करण्यात आली आहे. सर्व नागरिक आणि ग्रामस्थांच्या भावनांचा विचार करून सदर प्रस्तावित कचरा डेपो रद्द करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी चेतन भुजबळ यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# ज्ञानवापीवर पुन्हा सुनावणी

## अनवधानाने अंतरिमऐवजी मुख्य याचिका निकाली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी ज्ञानवापी अंजुमन इंतेजामियाच्या याचिकेवर पुन्हा सुनावणी करण्यास परवानगी दिली, जी 24 जुलै रोजी नकळत निकाली काढण्यात आली. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्यासह न्यायमूर्ती जेबी परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने बुधवारी हा निर्णय दिला.**

ज्ञानवापी मशिदीच्या व्यवस्थापनावर देखरेख करणाऱ्या अंजुमन इंतेजामिया समितीचे वकील हुजेफा अहमदी यांनी बुधवारी असा युक्तिवाद केला की 24 जुलै रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने एएसआय सर्वेक्षणाला स्थगिती देण्यासाठी दाखल केलेल्या अंतरिम याचिकेऐवजी मुख्य याचिका निकाली काढली होती.

इंतेजामिया समितीच्या या युक्तिवादावर, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, उत्तर प्रदेश सरकार आणि एएसआयच्या वतीने हजर झाले, म्हणाले की मशीद समितीच्या विशेष परवानगी याचिका पुनरुज्जीवित करण्यास त्यांचा कोणताही आक्षेप नाही. इंतेजामिया समितीने सर्वोच्च न्यायालयात आपल्या मुख्य याचिकेत हिंदू बाजूने वाराणसी जिल्हा न्यायालयात दाखल केलेला खटला फेटाळण्याची मागणी केली. या प्रकरणात, हिंदू बाजूने ज्ञानवापी संकुलाच्या एएसआय सर्वेक्षणाची मागणी केली होती, जी वाराणसी न्यायालयाने 21 जुलै रोजी मंजूर केली होती.



हिंदू पक्षाने ज्या कागदावर याचिका दाखल केली आहे त्यावर अधिकृततेसाठी आवश्यक शिक्का नाही, असे समितीने म्हटले होते. त्यामुळे, तो आदेश VII, नियम 11 (C) अंतर्गत दिवाणी प्रक्रिया संहितेच्या अंतर्गत डिसमिस केला जावा. त्याचवेळी एएसआयच्या सर्वेक्षणावर बंदी घालण्याची मागणी अंतरिम याचिकेत करण्यात आली होती. वाराणसी न्यायालयाच्या आदेशानुसार 24 जुलै रोजी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) पथक ज्ञानवापी संकुलाचे सर्वेक्षण करत होते. त्याविरोधात ज्ञानवापी मशीद समितीने सर्वोच्च न्यायालयात अंतरिम याचिका दाखल केली होती. यावर सुनावणी करत सुप्रीम कोर्टाने मशिदीतील एएसआयच्या सर्वेक्षणाला 26 जुलैपर्यंत स्थगिती दिली. या काळात मशीद समितीची इच्छा असेल तर ते वाराणसी न्यायालयाच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात जाऊ शकतात, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

वाराणसीमध्ये, ASI ने 24 जुलै रोजी ज्ञानवापीचे सर्वेक्षण सुरू केले. सील केलेला परिसर वगळता संपूर्ण कॅम्पसचे सर्वेक्षण करण्याची चर्चा होती.

सुरुवातीच्या 3 तासांच्या सर्वेक्षणात, संपूर्ण कॅम्पस टेपने मोजण्यात आले. कॅम्पसच्या चारही कोपऱ्यांवर 4 स्टँड कॅमेरे लावण्यात आले होते. प्रत्येक उपक्रमाची नोंद त्यात होती. दुसरीकडे, मुस्लिम पक्षाने सर्वेक्षणावर बहिष्कार टाकला.

### मशिदीचा दरवाजा उघडला नाही

हिंदू पक्षाचे वकील अनुपम कुमार यांनी सांगितले की, आज केवळ जागेचे मोजमाप करण्यात आले. मुस्लिमांच्या बाजूने अजिबात पाठिंबा नाही. मशिदीचे दार उघडले नाही. आत जाण्यासाठी जागा दिली नाही. आम्ही फक्त पश्चिमेकडील गेटवर आणि बाहेरून मोजत होतो. तोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती आली आणि कामकाज बंद पडले. ज्ञानवापी कॅम्पसमधून प्रशासकीय अधिकारी, सर्वेक्षण पथक आणि दोन्ही बाजूचे लोक बाहेर पडले.

# बिहारमध्ये आंदोलकांवर गोळीबार

## कटिहारमध्ये ग्रामस्थांचा विजेसाठी रास्ता रोको

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारमधील कटिहार जिल्ह्यात वीज विभागाच्या विरोधात रास्ता रोको करणाऱ्या एका व्यक्तीचा पोलिसांच्या गोळीबारात मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले. 5 जणांना गोळ्या घातल्याचा आरोप ग्रामस्थ करत असून त्यात तिघांचा मृत्यू झाला. पोलिसांनी एकाच्या मृत्यूला दुजोरा दिला आहे. खुर्शीद आलम (३४) असे त्याचे नाव असून तो बसल गावचा रहिवासी आहे. दुसरीकडे, बारसोईच्या चापाखोड पंचायतीत राहणारे नियाज आलम (वय 32) यांची प्रकृती चिंताजनक आहे.**



बारसोई उपविभागात बुधवारी दुपारी वीज विभागाच्या विरोधात अनेक जण वीज कार्यालयाला घेराव घालण्यासाठी आले होते. प्राणपूर्च्या बस्तौल चौक आणि बारसोई ब्लॉक मुख्यालयाचा मुख्य रस्ता जाम करून लोकांनी निदर्शने केली. यावेळी जमावाला नियंत्रणात आणण्यासाठी पोलिस पोहोचले, मात्र संतप्त लोकांनी पोलिसांवर दगडफेक केली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला. बुधवारी पहाटे 5 ते 11 वाजेपर्यंत देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे लोक संतप्त झाले. गोळीबार कसा झाला, हे कोणी आदेश दिले होते, त्याची चौकशी केली जाईल असे एसपी जितेंद्र कुमार यांनी सांगितले.

### राज्यात राजकारण तापले

कटिहारमध्ये निदर्शने करणाऱ्या लोकांवर गोळीबार केल्यानंतर राज्यातील राजकारण तापले आहे. विरोधक सरकारवर हल्लाबोल करत आहेत. सर्वप्रथम विरोधी पक्षनेते विजय सिन्हा मुख्यालयातून घटनास्थळी रवाना झाले आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष सम्राट चौधरी म्हणाले की, कटिहारमध्ये नितीशजींच्या पोलिसांनी गोळीबार करून सर्वसामान्यांना मारले. हे अत्यंत दुर्दैवी आहे. त्याची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल.

# यमुनेत गॅस पाइपलाइन फुटली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

यूपीच्या बागपत आणि हरियाणाच्या सोनीपतमधील यमुना नदीदरम्यान इंडियन ऑइलची गॅस पाइपलाइन फुटली. यानंतर पाण्यात उंच फवारे उसळू लागले. बागपतमध्ये 40 फुटांपर्यंत पाणी उडाले. दोन्ही ठिकाणी गॅस पाइपलाइनमधील दाब कमी करण्यात आला असून सतर्कतेचा इशाराही देण्यात आला आहे. अधिकाऱ्यांसोबतच एक पथकही घटनास्थळाच्या दुरुस्तीसाठी पाठवण्यात आले आहे. उत्तर प्रदेशातील एसडीएम सुभाष सिंह यांनी सांगितले की, बागपतच्या जागोश गावात रिफायनरीची पाइपलाइन फुटली आहे. हरियाणाच्या बाजूने पाइपलाइनची दुरुस्ती केली जात आहे. ही पाइपलाइन पानिपतमार्गे सोनीपत, बागपत गाझियाबाद, दादरी आणि नोएडापर्यंत जाते. ही पाइपलाइन आयजीएल कंपनीची असल्याचे सांगितले जात आहे. बागपतच्या अधिकाऱ्यांनी आजूबाजूच्या लोकांना सतर्क केले आहे. डीएमच्या सूचनेनंतर परिसरातील गॅस पुरवठा बंद करण्यात आला. पाइपलाइन फुटल्यामुळे यमुनेमध्ये उंचच उंच पाण्याचे कारंजे उडू लागले. परिसरात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या घटनेचा व्हिडिओही सोशल मीडियावर टाकण्यात आला आहे. पाइपलाइनमध्ये सुधारणा केल्यानंतर त्यात स्फोटाच्या कारणांचाही तपास केला जाणार असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. स्थानिक लोकांनी सांगितले की त्यांनी पहाटे चार वाजता पाहिले तेव्हा नदीच्या मध्यातून धूर, आग आणि स्फोटाचे आवाज येत होते. यानंतर गावातील लोकांनी घाबरून जाऊन पोलीस-प्रशासनाला माहिती दिली.

# सांगलीत राजपाल यादवचं 'काम

बॉलीवूडमध्ये आपल्या विनोदी अभिनयानं गेल्या तीन दशकांहून अधिक काळ प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले आहे. राजपाल यादवनं त्याचा वेगळा प्रेक्षकवर्ग केला आहे. ९० च्या दशकानंतर विनोदी कलाकारांची जी परंपरा खंडित झाली होती ती पुढे नेण्याचे काम राजपालनं केले आहे. सध्या राजपाल यादव हा त्याच्या एका चित्रपटातील भूमिकेमुळे ट्रेंडचा विषय होतो आहे. यापूर्वी देखील राजपालनं वेगवेगळ्या भूमिका साकारून आपण किती व्हर्सेटाईल अभिनेते आहोत हे दाखवून दिले होते. त्याच्या व्हायरल झालेल्या मुलाखतीतून राजपालनं आपल्या कुटूबियांविषयी सांगितले होते. मी कायम




विनोदी भूमिका करणे हे त्यांना आवडत नाही. चुप चुपके नावाच्या चित्रपटामध्ये मी सहकलाकारांकडून चित्रपटामध्ये खूप मार खाल्ला होता. चुपचुपके चित्रपटावरुन राजपालच्या आईनं त्याला तू नेहमीच मार खातो कधीतरी हिरो हो असे म्हटले होते. यानंतर मी काही वेगळ्या भूमिकांचा विचार केला त्यानुसार वाटचाल करण्याचा प्रयत्न केल्याचे राजपालनं म्हटले आहे. यासगळयात आता राजपालचा नवा चित्रपट येतो आहे. त्याचे नाव काम चालू आहे असे आहे. त्याच्या पोस्टरनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. राजपालची या चित्रपटामध्ये काय भूमिका असणार याची चाहत्यांना कमालीची उत्सुकता आहे.

# माझी गुणी सून!



बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंग आणि आलिया भट्ट यांच्या बहूप्रतिक्षित चित्रपट 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' हा चित्रपट येत्या शुक्रवारी म्हणजेच 28 एप्रिल 2023 रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर आणि गाणि रिलिज करण्यात आली आहे. ज्याला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसादही मिळाला. आई झाल्यानंतर आलिया पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर दिसणार असल्याने चाहते तिच्या चित्रपटासाठी उत्सूक आहेत. मंगळवारी रणवीर सिंग आणि आलिया भट्ट यांच्या चित्रपटाची बॉलिवूडमधल्या काही खास कलाकारांसाठी स्पेशल स्क्रिनिंग आयोजित करण्यात आली होती. यावेळी रणबीर आणि आलियाच्या जोडीनं प्रेक्षकांचं लक्ष वेधलं. रणबीरशिवाय करिश्मा कपूर, कतरिना कैफ, विकी कौशल, शबाना आझमी, जया बच्चन, नेहा धुपिया, अंगद बेदी, सारा अली खान, मलायका अरोरा अनेक कलकार दिसले सर्व कलाकारांनी हा चित्रपट पाहिला आणि दोघांचे कौतुक केले. पण चित्रपटाचा पहिला रिव्ह्यू रणबीर कपूरने देखील बायकोचं तोंड भरुन कौतुक केलं. आलिया भट्टची सासू नीतू कपूरने देखील 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' या चित्रपटाचा रिव्ह्यू दिला आहे. नीतू कपूरला 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' हा चित्रपट खुप आवडला ज्येष्ठ अभिनेत्री नीतू कपूर यांनी त्यांच्या इन्स्टाग्रामच्या स्टोरीला 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' चित्रपटाचे पोस्टर शेअर केले आहे. यासोबत त्या लिहितात की, 'सर्व कलाकारांचा अप्रतिम अभिनय... सर्वांचे मनोरंजन करणारा चित्रपट. आलिया भट्ट खूपच सुंदर दिसतेय. सासूबाई कौतुक केल्यामुळे आलियालाही खुप आनंद झाला तिनेही स्टोरीला शेयर करत लव्ह यू असं म्हटलं आहे.'रॉकी और रानी की प्रेम कहानी' या चित्रपटात आलिया भट्ट आणि रणवीर सिंगशिवाय धर्मेंद्र, जया बच्चन आणि शबाना आझमी देखील दिसणार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन करण जोहरने केले आहे. बऱ्याच वर्षांनंतर करण जोहर दिग्दर्शनात पुनरागमन करत आहे. आता येत्या शुक्रवारी रिलिज होणाऱ्या चित्रपटाबद्दल चाहते खुप उत्सूक दिसत आहे. मात्र चित्रपटला प्रेक्षकांचा कसा प्रतिसाद मिळतो हे तर बॉक्स ऑफिसच्या कलेक्शन वरुनच कळेल.



# कंगना राणौतला कोर्टाचा दणका!

गेल्या काही दिवसांपासून बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणौत आणि लेखक-गीतकार जावेद अख्तर यांच्या प्रकरणाची जोरदार चर्चा होती. आता जावेद अख्तर यांच्यासोबतच्या कायदेशीर लढाईत कंगना राणौतला कोर्टानं मोठा दणका दिला आहे. मुंबईच्या दंडाधिकारी न्यायालयाने जावेद अख्तर यांच्यावर लावण्यात आलेले चार आरोप फेटाळले तर दोन आरोपांबाबत समन्स पाठवले आहे. कंगनाने जावेद अख्तर यांच्यावर अनेक आरोप केले होते. ज्यावेळी कंगना आणि हृतिक रोशन यांच्यात वाद झाला होता त्यावेळी त्यांनी कंगनाला आणि तिची बहीण रंगोली चंदेलला जावेद यांनी आपल्या घरी बोलावून हृतिक रोशनची माफी मागायला सांगितली होती. न्यायालयाने म्हटले की, गीतकार जावेद अख्तर यांच्यावर खंडणीचा कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. मुंबई मॅजिस्ट्रेट कोर्टाने असेही म्हटले आहे की एखाद्या व्यक्तीला लेखी माफी मागायला सांगणं हे कायद्या अंतर्गत येत नाही कारण कायदेशीर हक्क तयार, विस्तार किंवा सोयीच्या मार्गाने हस्तांतरित केला जाऊ शकत नाही. कंगनाने आरोप केला होता की जावेद अख्तर यांनी तिला धमकावले आणि बळजबरीने हृतिक रोशनची माफी मागण्यास सांगितले. त्याचबरोबर तिने जावेद यांच्यावर खोटे आणि निराधार वक्तव्य करून तिची प्रतिमा खराब केल्याचा आरोप केला. तिच्या नैतिक चारित्र्यावर घाला घालणे, तिची प्रतिष्ठा आणि पावित्र्य दुखावल्याचा आरोप केला आहे. इतकच नाही तर त्यांनी जाणुन बजून जाणूनबुजून तिच्या नम्रतेचा अपमान आणि वैयक्तिक संबंधांवर टिप्पणी केली आहे. तर जावेद अख्तर यांनी कंगना राणौतविरोधात मानहानीची तक्रार दाखल केली होती. मंगळवारी दंडाधिकारी आरएम शेख यांनी सर्व युक्तिवाद आणि सबमिशन विचारात घेतल्यानंतर निर्णय दिला. कंगना राणौतने केलेल्या सहा आरोपांपैकी फक्त दोन आरोपांवरच ते कारवाई करणार असल्याचं सांगितलं. या दोन आरोपात जावेद अख्तर यांना धमकावणे आणि महिलेच्या विनयशीलतेचा अपमान केल्याच्या आरोपाखाली समन्स जारी केले.

# पंखुरीची गोड बातमी!



टीव्हीवरील लोकप्रिय जोडपे गौतम रोडे आणि अभिनेत्री पंखुरी अवस्थी यांनी चाहत्यांना गोड बातमी दिली आहे. गौतम आणि पंखुरी आई-वडील झाले आहेत. गौतम रोडे आणि पंखुरी अवस्थी हे टीव्हीवरील सर्वात लोकप्रिय जोडपे आहेत. त्याच्या घरी आता आनंदाचं वातावरण आहे. गौतम आणि पंखुरी यांना एक मुलगा आणि एक मुलगी झाली आहे. बुधवारी सकाळी यादोघांनी ही गोड बातमी सोशल मीडियावर शेअर केली. तेव्हापासून सर्व सेलेब्स आणि चाहते पंखुरी आणि गौतमला दोन नवीन छोटे पाहुणे आल्याच्या शुभेच्छा देत आहेत गौतमने याबाबत पोस्ट शेयर केली होती. यात ट्राईस ब्लेस्ड. त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी झाल्याचे सांगितले. 25 जुलैला पंखुरीने जुळ्या मुलांना जन्म दिला आहे.

# बुमराह आयर्लंड दौऱ्यावर कर्णधार ?

## » हार्दिक, रोहित आणि सूर्यकुमार आशिया कपच्या तयारीत

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**18 ऑगस्टपासून आयर्लंडविरुद्ध सुरू होणाऱ्या टी-20 मालिकेसाठी नवा कर्णधार टीम इंडियाची कमान सांभाळू शकतो. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह या दौऱ्यातील संघात सामील झाल्यास त्याला कर्णधारपद मिळू शकते.**

स्पोर्ट्स वेबसाइट क्रिक बझच्या रिपोर्टनुसार, वरिष्ठ खेळाडूंना आयर्लंड दौऱ्यातून विश्रांती मिळेल. तर मर्यादित षटकांच्या संघाचा उपकर्णधार हार्दिक पंड्या आणि टी-20 विशेषज्ञ सूर्यकुमार यादव प्रमुख खेळाडूंसह बंगळुरू येथे होणाऱ्या आशिया चषकाची तयारी करतील. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये गोलंदाजी करण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही काळापासून तो फुल फ्लोमध्ये गोलंदाजी करत आहे. टीम इंडिया आयर्लंडविरुद्ध फक्त 3 टी-20 खेळणार आहे, जिथे बुमराहला एका सामन्यात फक्त 4 षटके टाकावी लागणार आहेत. कमी षटके गोलंदाजी केल्याने बुमराहवर जास्त दबाव येणार नाही. अशा परिस्थितीत तो आशिया चषक आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेची तयारीही करू शकेल. भारताला 18, 20 आणि 23 ऑगस्ट रोजी

आयर्लंडमध्ये 3 टी-20 सामने खेळायचे आहेत. जर बुमराहला आयर्लंड दौऱ्यावर संधी मिळाली, तर इतर वरिष्ठ खेळाडूंच्या अनुपस्थितीत त्याच्याकडेही कर्णधारपद सोपवले जाऊ शकते. बुमराहने इंग्लंडविरुद्धच्या एका कसोटीत भारताचे नेतृत्व केले आहे. हा सामना गेल्या वर्षी जुलैमध्ये झाला होता, ज्यामध्ये भारताचा पराभव झाला होता. वृत्तानुसार, 24 आणि 25 ऑगस्ट रोजी आशिया चषकाची तयारी शिबिर बंगळुरू येथे होणार आहे. मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी या शिबिरात संघातील सर्व खेळाडूंना सहभागी करून घेण्याची मागणी केली आहे, कारण या स्पर्धेतून एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेची तयारी निश्चित केली जाऊ शकते. या स्थितीत रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा यांसारख्या वरिष्ठ खेळाडूंसोबत हार्दिक पांड्याही शिबिराचा भाग




### भारतीय संघ श्रीलंकेला जाणार

आशिया चषकात भारताचा पहिला सामना 2 सप्टेंबरला पाकिस्तानशी होणार आहे. जर संघ अंतिम फेरीत पोहोचला तर त्यांना येथे 6 सामने खेळावे लागतील. ही स्पर्धा १७ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. यानंतर संघ भारतातच ऑस्ट्रेलियाविरुद्ध 3 वनडे खेळणार आहे. 27 सप्टेंबरला होणाऱ्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यानंतर 29 सप्टेंबरपासून विश्वचषकाचे सराव सामने सुरू होतील.

असेल. वेस्ट इंडिजविरुद्धच्या T20I मालिकेसाठी उपकर्णधार म्हणून नेमण्यात आलेला सूर्यकुमार यादव देखील आशिया चषक शिबिरात सामील होण्याची शक्यता आहे कारण त्याला मधल्या फळीतील फलंदाज श्रेयस अय्यरच्या अनुपस्थितीत एकदिवसीय संघात स्थान देण्यात आले आहे.

वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला या शिबिरातून सूट मिळू शकते. द्रविडसह उर्वरित कोचिंग स्टाफला आयर्लंड दौऱ्यातून विश्रांती देण्यात आली आहे

जेणेकरून ते आशिया चषक आणि विश्वचषक स्पर्धेसाठी चांगली तयारी करू शकतील. 24 आणि 25 ऑगस्ट रोजी बंगळुरू येथे 2 दिवसांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित केले जाऊ शकते. शिबिरानंतर टीम इंडिया आशिया कप खेळण्यासाठी श्रीलंकेला रवाना होणार आहे.

---

# भारतीय खेळाडूंचा जलवा!

## » यशस्वीची मोठी झेप, रोहितचे झाले प्रमोशन

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**भारताचा युवा सलामीवीर यशस्वी जैस्वालने ताज्या ICC कसोटी क्रमवारीत मोठी कामगिरी केली आहे. तो ११ स्थानांची मोठी झेप घेत ६३व्या स्थानावर पोहोचला आहे. भारतीय कर्णधार रोहित शर्मालाही वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेत चांगल्या कामगिरीचा फायदा झाला असून बुधवारी जाहीर झालेल्या फलंदाजांच्या ताज्या क्रमवारीत तो नवव्या स्थानावर पोहोचला आहे. .**

त्यामुळे एकप्रकारे आयसीसी क्रमवारीत या दोन भारतीय फलंदाजांचा बोलबाला दिसून येत आहे.

२१ वर्षीय जैस्वालनेने पोर्ट




### अश्विन यादीत अव्वल स्थानावर

भारताचा अनुभवी फिरकीपटू रविचंद्रन अश्विन (८७९) गोलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानावर आहे, तर रवींद्र जडेजा (७८२) सहाव्या स्थानावर आहे. वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजनेही क्रमवारीत प्रगती केली असून सहा स्थानांनी प्रगती करत ३३व्या स्थानावर पोहोचला आहे. श्रीलंकेच्या प्रभात जयसूर्याने गॅलेमध्ये सात विकेट्स घेत सात स्थानांनी प्रगती करत सातव्या क्रमांकावर पोहोचला आहे. जयसूर्याचा फिरकी जोडीदार रमेश मेंडिस या सामन्यात सहा विकेट्ससह एक स्थानाने पुढे २१व्या स्थानावर पोहोचला आहे.

ऑफ स्पेन येथे वेस्ट इंडिजविरुद्ध अनिर्णित राहिलेल्या दुसऱ्या कसोटीत ५७ आणि ३८ धावा केल्या. यामुळे त्याला आता ४६६ गुण मिळाले आहेत. दुसऱ्या कसोटीत ८० आणि ५७ धावा करणारा रोहित हा भारतीय कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीत सर्वोच्च स्थानी आहे. त्याचे ७५९ गुण आहेत आणि तो श्रीलंकेच्या दिमुथ करुणारत्नेबरोबर नवव्या स्थानावर आहे. कसोटी क्रमवारीत रोहितनंतर ऋषभ पंत दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याचे ७४३ गुण असून एका स्थानाच्या नुकसानासह तो १२व्या स्थानावर आहे. विराट कोहली ७३३ गुणांसह १४व्या स्थानावर कायम आहे. ॲशेसमध्ये चांगली कामगिरी करणारा ऑस्ट्रेलियाचा मार्नस लाबुशेन आणि इंग्लंडचा जो रूट यांनी प्रत्येकी तीन स्थानांनी प्रगती करत अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर पोहोचले आहे. न्यूझीलंडचा फलंदाज केन विल्यमसन ८८३ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानावर आहे. इंग्लंडचा जॅक क्रॉली १३ स्थानांनी ३५व्या, हॅरी ब्रूक ११व्या आणि जॉनी बेअरस्टो तीन स्थानांनी वाढून १९व्या स्थानावर आहे.

# भारत-पाक सामना एक दिवस आधीच

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात एकदिवसीय विश्वचषक सामना एक दिवस आधी होऊ शकतो. दोन्ही संघांमधील सामना 15 ऑक्टोबर रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. याच दिवशी नवरात्रोत्सवालाही सुरुवात होत आहे. हे पाहता सुरक्षा एजन्सीने सामन्याची तारीख किंवा ठिकाण बदलण्याची सूचना केली आहे.

वृत्तानुसार, हा सामना आता अहमदाबादमध्ये 14 ऑक्टोबरलाच होऊ शकतो.

दुसरीकडे, बीसीसीआयचे सचिव जय शहा यांनी उद्या, गुरुवारीच विश्वचषक स्पर्धेच्या ठिकाणाच्या राज्य संघटनेची तातडीची बैठक बोलावली आहे. या बैठकीत सामन्याची नवी तारीख किंवा ठिकाण बदलण्याबाबत निर्णय घेतला जाऊ शकतो, असे मानले जात आहे. नाव न सांगण्याच्या अटीवर, बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, “आम्ही इतर पर्याय (स्थळे) शोधत आहोत, लवकरच निर्णय घेतला जाईल.

सुरक्षा एजन्सीने सांगितले की, भारत-पाकिस्तानचा हाय प्रोफाईल सामना नवरात्रीला आहे. या सामन्यासाठी हजारो चाहते अहमदाबादला रवाना होतील, या दिवशी नवरात्रीमुळे शहरात मोठी गर्दी असेल. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना 14 ऑक्टोबरला हलवला तर 15 ऑक्टोबरला इंग्लंड-अफगाणिस्तान सामना होऊ शकतो. वेळापत्रकानुसार सध्या 14 ऑक्टोबर रोजी 2 सामने होणार आहेत.